महाराष्ट्र शासन
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती-४४४६०४
नॅक मुल्यांकन-'अ' दर्जा३.३२CGPA
(स्वायत्त संस्था)

प्र.संचालक
डॉ. केशव.पी.तुपे
Keshavtupe७१@gmail.com
मोबाईल क्र.९४२०२८५८७८

कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक
०७२१ - २५३१७०४,२५३१७०६
संलग्नित:संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
विद्यापीठ महाविद्यालय क्रमांक : १०१

वेबसाईट -www.gvishamt.org
directorgvishamravati@gmail.com
UGC२f , १२ (B)

दिनांक - ११.०९.२०२६

जावक क्र. शाविज्ञाविसं/आस्था-३/२०२६-२७/ 1670

प्रति,
पुरवठादार

**विषय :-** **उत्तर पत्रिका व पुरवणी चे दरपत्रक सादर करण्याबाबत..**
**संदर्भ :-** परिक्षा नियंत्रक यांचे पत्र २९८ दिनांक ०७.०९.२०२६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संस्थेतील परिक्षा विभागातंर्गत घेण्यात येणाऱ्या सेमीस्टर व वार्षिक परिक्षाकरीतां लागणारी उत्तरपत्रिका व पुरवणीपत्रिका पुरविण्याकरीता दरपत्रक सादर करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे. तरी दिलेल्या विहीत मुदतीमध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. **उत्तरपत्रिका व पुरवणीपत्रिकेचा नमुना संस्थेच्या परिक्षा विभागामध्ये पाहणीकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल.** सदरील निविदाप्रकीया ही खुल्या पध्दतीने राबविण्यात येत आहे. त्यामुळे पुरवठादारास कुठल्याही स्त्रोताद्वारे माहीती प्राप्त झाल्यास त्यांनी कार्यालयातुन निविदा अर्ज प्राप्त करुन घ्यावा.

**दरपत्रक सादर दिनांक ११.०९.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते दिनांक १८.०९.२०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करण्यात यावे.** तसेच नमुद केलेल्या कालावधीनतंर दरपत्रक स्विकारले जाणार नाही. याबाबत सर्व पुरवठादारांनी नोंद घ्यावी.

(डॉ.केशव पी. तुपे)
संचालक,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

11/09/26

प्रत :- १. शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था संकेत स्थळावर www.gvishamt.org
२. शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था नोटीस बोर्डवर

**दरपत्रक सुचना क्रमांक /२०२६ दिनांक ११.०९.२०२६**

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती करीता खालील बाबी खरेदी करावयाच्या असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | खरेदीची बाब व तांत्रिक तपशील | | | खरेदी करावयाची संख्या | एकुण अंदाजीत किंमत प्रती नग (सर्व करांसह) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तरपत्रिका (२४ पानी) | लेखी परिक्षेकरीता | A४ size ९०gsm Horizental | १५,००० | |
| २ | पुरवणी उत्तरपत्रिका (०८ पानी) | लेखी परिक्षेकरीता | A४ size ९०gsm Horizental | ७,५०० | |
| ३ | प्रात्याक्षिक उत्तरपत्रिका (०८ पानी) | प्रात्याक्षिक परिक्षेकरीता | A४ size ९०gsm Horizental | ५,००० | |
| ४ | प्रात्याक्षिक उत्तरपत्रिका (०४ पानी) | प्रात्याक्षिक परिक्षेकरीता | A४ size ९०gsm Horizental | ३,००० | |

**दरपत्रक सुचना करीता अटी व शर्ती**

१. दरपत्रक सुचना प्रसिध्द करण्याची दिनांक ११.०९.२०२६ वेळ दुपारी १२.०० वाजता
२. दरपत्रके कार्यालयात सादर करावयाची दिनांक ११.०९.२०२६ दुपारी १२.०० ते दिनांक १८.०९.२०२६ दुपारी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळत)
३. दरपत्रके सादर करावायाची पध्दत-सिलबंध दोन लिफाफे पध्दत
a. **तांत्रिक लिफाफा-** दरपत्रक सुचनेत मागणी केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्र
b. **दराचा लिफाफा-** संलग्न केलेल्या विहीत नमुण्यात
४. दिनांक १८.०९.२०२६ दुपारी ५.०० नंतर कोणताही लिफाफा स्विकारण्यात येणार नाही.
५. दरपत्रक सादर केल्यावर रितसर पोच घ्यावी (आवक क्रमांक, दिनांक सही शिक्का )
६. उत्तरपत्रिकेचा पुरवठा विनिर्देशाप्रमाणे पुरवठा आदेश मिळाल्यापासुन १ आठवडयाच्या आत करावा. वस्तु सुस्थितीत प्राप्त झाल्याची खात्री झाल्याशिवाय देय प्रदान होणार नाही.
७. तांत्रिक लिफाफयात पात्र/अपात्र करणे, दरपत्रक स्विकारणे/नाकारणे बाबत सर्वस्वी अधिकार संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांच्या कडे असतील.
८. एका एजंन्सीला केवळ एकच दरपत्रक भरावयाची मुभा असेल.
९. पुरवठादाराने दरपत्रक सादर करतांना त्याची अट नमुद केल्यास दरपत्रके अमान्य करण्यात येतील
१०. कोषागारात देयक सादर करतांनाच्या कपाती नियमाप्रमाणे करण्यात येईल.
११. सदरील अंदाजपत्राकातील नमुद दर हे आर्थिक वर्ष २०२६-२७ करीता ग्राहय समजण्यात येईल.
१२. पुरवठादाराने आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये नमुद दराप्रमाणे उत्तरपत्रिका व पुरवणीपत्रिका पुरविणे बंधनकारक राहील.
१३. पुरवठादाराला वाहतुक खर्चाची स्वतंत्र मागणी करता येणार नाही.

**तांत्रिक सिलबंद लिफाफयात सादर करावयाच्या बाबी.**

१. दरपत्रक सुचना प्रसिद्धीच्या दिनांकास वैध असलेले शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र किंवा इतर अनुषंगिक नोंदणी प्रमाणपत्र (MSSIC/ उद्योग आधार )
२. पॅन कार्ड झेरॉक्स प्रत
३. VAT/CST/GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र संलग्न करावे. प्रमाणपत्र नसल्यास त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडावे

**दराचा सिलबंद लिफाफा सादर करावयाचा नमुना**

दर नोंदवतांना सर्व प्रकारचे कर /वाहतुक खर्च, स्थापित करावयाचा खर्च यासह नमुद करावे. खाली दिलेल्या नमुण्यात एजंन्सीने आपल्या लेटर हेडवर द्यावेत.